**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांकः- १८/०१/२०१८

# दिंडोरी तालुक्यातील आंबेगण शिवारातील खुनाचे गुन्हयाचा उलगडा - ग्रामीण पोलीसांची कामगिरी

---

दिंडोरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २७ नोव्हेंबर २०१७ रोजी आंबेगण शिवारात बंधा-याचे पाण्यात एका अनोळखी युवतीचे प्रेत मिळुन आले होते. मयत युवतीस कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी अज्ञात कारणावरून डोक्यावर आणि चेह-यावर काहीतरी टणक वस्तुने मारून जिवे ठार करून चेहरा विद्रुप करून पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने प्रेताचे हातपाय बांधुन प्लॅस्टिकचे गोणीत घालुन त्यात दगड टाकुन बंधा-यातील पाण्यात टाकुन दिले आहे. सदर घटनेबाबत **दिंडोरी पोलीस ठाणेस I गु.रजि.नंबर ३२७/२०१७ भादवि कलम ३०२,२०१** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेमुळे नाशिक शहरासह दिंडोरी तालुक्यात खळबळ उडाली होती. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो., अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.,** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** यांनी सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तात्काळ घटनास्थळी धाव घेवुन घटनास्थळाची बारकाईन पाहणी केली. तसेच मयत युवतीने परिधान केलेले अंगवस्त्र व तिचे अंगावरील चिजवस्तुंचे परिक्षण करून ग्रामीण पोलीसांचे विशेष पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तसेच दिंडोरी पोलीसांचे पथकास सदर युवतीचे खुनाचा कसोशिने तपास करणेबाबत सुचना दिल्या. तसेच सदर खुनाचे गुन्हयाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत होता.

त्यानुसार ग्रामीण पोलीसांचे विशेष पोलीस पथकातील **पोलीस उपनिरीक्षक श्री. नितीन पाटील, पोहवा दत्ता हांडगे, पोना चेतन मोरे, पोशि राजेश काकड, प्रशांत काकड** यांचे पथकाने घटनास्थळावर मिळालेल्या सदर मयत युवतीचे कमरेला जिन्स पॅन्टवर लावलेल्या बेल्टचे बक्कल प्लेटवर ***मराठा विद्याप्रसारक समाज, नाशिक, बहुजन हिताय बहुजन सुखाय*** असेलेल्या चिन्हा प्रमाणे जिल्हयातील सर्व शाळा महाविद्यालये, तसेच मयत युवतीचे वयाशी व वर्णनाशी साम्य असलेल्या संपुर्ण नाशिक ग्रामिण जिल्हा व नाशिक शहर परीसरातील सर्व पोलीस ठाणे हद्दीतील दाखल मिर्सींग मुलींच्या बाबतीत विशेष माहीती काढुन शोध घेत असतांना मिळालेल्या गुप्त माहिती प्रमाणे मखमलाबाद, नाशिक येथील एक मुलगी दिड ते दोन महिन्यांपासुन गावात दिसुन येत नाही अशी खात्रीलायक माहीती मिळालेवरून सदर मुलीचा कसुन शोध घेतला असता मखमलाबाद नाशिक येथिल गंगानाथ कपिलेश्वर झा यांची मुलगी नामे सोनाली गंगानाथ झा ही दिड ते दोन महिन्यांपासुन गावात दिसुन येत नसल्याबद्दल समजले. त्यानुसार विशेष पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मखमलाबाद येथे जावुन तिचे कुटुंबीयांची भेट घेवुन त्यांचे मुलीबाबत विचारपुस केली असता ती दिड ते दोन महीन्यांपासुन घरातुन निघुन गेली असुन परत घरी आली नाही. तसेच तिचे लग्न झाले असुन ती बहुतेक सासरी गेली असावी अशी माहिती मिळाली. म्हणुन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारीयांनी सदर गुन्हयातील मयत युवतीचे फोटो त्यांना दाखविले असता त्यांनी ती मुलगी, त्यांची मुलगी सोनाली हिच असल्याचे सांगीतले. तिचे कपडे व इतर अंगावरील वस्तुही त्यांनी ओळखल्या त्यामुळे नमुद गुन्हयातील मयत ही **सोनाली गंगानाथ झा रा.मखमलाबाद, नाशिक** हीच असल्याची पुर्ण खात्री झाली.

सदर गुन्हयातील मयत युवतीची ओळख पटविल्यानंतर तिचे कोणाशी प्रेमसंबंध अथवा वैर होते का याबाबत माहिती घेतली असता तिचे मखमलाबाद गावातील एका इसमाशी दोन ते तीन वर्षांपासुन प्रेमसंबंध असल्याचे समजले. तसेच सदर युवतीचे प्रेमसंबंधामुळे त्यांचे घरात ब-याचदा वादही झाले होते. सदर युवतीबाबत मिळालेल्या माहितीवरुन मखमलाबाद येथील तिचा प्रियकर यास संशयीतरित्या ताब्यात घेण्यात आले. त्यास विश्वासात घेवुन युक्ती प्रयुक्ती तसेच कला कौशल्य वापरुन त्याचेकडे तपास केला असता त्याने मयत सोनाली झा हिचेशी प्रेमसंबंध असल्याचे सांगितले तसेच त्यांचे प्रेमसंबंधामुळे कौटूंबिक वाद निर्माण झाला होता त्याकाराणावरून मनात राग धरून त्याने दिनांक २० नोव्हेंबर २०१७ रोजी सोनाली हिचे डोक्यात मंडप बांधायच्या लोखंडी खुट्टीने जबर मारहाण करून तिस जिवेठार मारून तिचे हात पाय बांधुन तिस गोणीत टाकुन आंबेगण शिवारातील तलावाच्या पाण्यात गोणीत दगडे भरूण मृतदेह पाण्यात फेकुन दिले असलेबाबत कबुली दिली आहे. तसेच सदर कृत्यात त्याला त्याचा मखमलाबाद येथील मित्र याने मदत केली असल्याचे सांगितले असुन मयत युवतीचा मृतदेह टाकण्यासाठी त्यांनी मारूती सुझुकी कंपनीची झेन गाडी वापरली असलेबाबत सांगितले आहे. सदर प्रकारणातील आरोपीस दिंडोरी पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे, तसेच त्याचे साथीदाराचा पोलीस पथक शोध घेत असुन पुढील तपास चालु आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो**, अपर पोलीस अधीक्षक श्री. **विशाल गायकवाड सो**, व पोलीस निरीक्षक स्थागुशा **श्री. अशोक करपे सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकातील **पोलीस उपनिरीक्षक श्री. नितीन पाटील**, **पोहवा दत्ता हांडगे, पोना चेतन मोरे, पोशि राजेश काकड, प्रशांत काकड** यांचे पथकाने अत्यंत चिकाटी व कौशल्यपुर्ण तपास करून सदर अनोळखी मयत युवतीची ओळख पटवुन सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबाबत मा. पोलीस अधीक्षक, श्री. संजय दराडे, सो यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करुन केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत १५,०००/- रुपयाचे बक्षिस जाहिर केले आहे.